
# Principal`s MEET



एनईपी राबविण्यात सर्व घटक महत्त्वाचे : आदिती तटकरे

नमस्कार , लोकमत तर्फे सोमवार दिनांक १२ डिसेंबर रोजी नवीन शिक्षण धोरणावर चर्चा करण्यासाठी *लोकमत स्कूल समिट २०२३* हा कार्यक्रम यशदा पुणे येथे घेण्यात आला. या कार्यक्रमाला महिला व बालकल्याण मंत्री मा. आदिती तटकरे , शिक्षण आयुक्त मा.सूरज मांढरे तसेच नामवंत शिक्षण तज्ञ आणि कँपस क्लब च्या आपल्या शाळांचे प्रिंसिपल उपस्थित होते. या समीट मध्ये नवीन शैक्षणिक धोरणावर सखोल चर्चा तसेच मार्गदर्शन करण्यात आले.

लोकमत



## महावीर शाळेत टाकळकर यांनी गुंफले पहिले पुष्प

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महावीर इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये 'टॉर्च बेरर' या उपक्रमांतर्गत 3 ऑगस्टला टाकळकर क्लासेसचे केदार टाकळकर यांचे व्याख्यान झाले. या प्रसंगी प्राचार्या डॉ.पल्लवी सोमण, महावीर प्रतिष्ठानचे सचिव संजय छाजेड, विजयराज रांका आदी मान्यवर उपस्थित होते.

यानंतर, टाकळकर सरांनी उपस्थित इ. १०चे पालक व विद्यार्थी यांना अभ्यासाचे दडपण न घेता, कसे नियोजन करावे, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेची विद्यार्थिनी पूर्वा सरडे व भव्य शहा यांनी केले, तर आभार प्रदर्शन गायत्री कुरणे हिने केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रशालेच्या प्राचार्या डॉ.पल्लवी सोमण व इतर शिक्षकांनी केले.

(वा.प्र.)